M.I.D.C Police Station, Jalgaon,
Dist.Jalgaon, Maharashtra
एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन, जळगांव ता.जि.जळगांव महाराष्ट्र
Ph. No.02557- 2210500. Email ID- pstn.midc@gmail.com.

-- प्रेस नोट --

दिनांक 23/10/2026

प्रति,

मा.संपादक,

---------------------------

**विषय-** जळगाव शहरातील गोदावरी कॉलेज जवळील कोयता व तलवारीने प्राणघातक हल्ला करुन फरार झालेल्या आरोपीतांना एम.आय.डी.सी पोलीसांनी 12 तासात केले अटक..

जळगाव शहरातील एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गोदावरी इंजिनिअरिंग कॉलेज जवळील, दिनांक 23/10/ 2026 रोजी सकाळी 08.00 वाजताचे सुमारास आरोपी क्रं.1) आनंद हरी पाटील वय 24 वर्षे 2) हर्षल रविद्र शिंदे, वय 20 वर्षे 3) गौरव विनोद पाटील वय 20 वर्षे 4) विधी संघर्षित बालक सर्व रा. खेडी ता.जि. जळगाव अशांनी जखमी फिर्यादी किशोर माधवराव बाविस्कर वय 41 वर्ष, धंदा भंगार व पान टपरी, रा. शिवनगर, खेडी बु. ता.जि. जळगाव यास त्याने उधारीवर पान सिगारेट दिले नाही या कारणावरुन फिर्यादी यांना शिवीगाळ करुन तुम्हा दोन्ही भावांना जिवंत सोडणार नाही अशी धमकी देवुन जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने आरोपीतांनी फिर्यादी यांना लाथाबुक्यांनी मारहाण करून आरोपी आनंद पाटील याने त्याचे ताब्यातील धारदार कोयत्याने व हर्षल शिंदे याने त्याच्या हातातील तलवारीने फिर्यादी यांचेवर प्राण घातक हल्ला करून पळुन गेले होते. सदर प्रकरणी जखमी किशोर माधवराव बाविस्कर वय 41 वर्ष यांनी सिव्हील हॉस्पीटल जळगाव येथे उपचार घेत असतांना दिलेल्या जबाब वरुन एमआयडीसी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.870/2026, भारतीय न्याय संहीता सन 2023 चे कलम 109(1),351(2),352,3(5) सह आर्म अ‍ॅक्टं कलम 4/25 प्रमाणे दिनांक 23/10/2026 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी मा.श्रीकांत धिवरे, साहेब पोलीस अधीक्षक जळगाव यांनी मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ एमआयडीसी पोस्टे चे गुन्हे शोध पथकाचे अधिकारी व अंमलदार यांचे पथकास नेमुन सदर पथकास योग्य त्या सुचना देवुन गुन्हयातील आरोपी जेरबंद करणे बाबत आदेशित केले होते.

वर नमुद प्रमाणे गुन्हे शोध पथकाने घटनास्थळी पाहणी करुन आरोपी सबंधी आवश्यक माहिती घेवुन गोपणीय माहीतीव्दारे गंभीर गुन्हा करणारे आरोपी नामे - 1) आनंद हरी पाटील वय 24 वर्षे 2) हर्षल रविद्र शिंदे, वय 20 वर्षे 3) गौरव विनोद पाटील वय 20 वर्षे रा. सर्व रा.खेडी ता.जि. जळगाव अशांना गुन्हयाचे तपासकामी अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा.श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक साहेब जळगाव, मा.संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक जळगाव, मा.नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव भाग, पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विठठल पवार, पोहेकॉ/रामकृष्ण पाटील, पो.ना/प्रदीप चौधरी, पोहेकॉ/ संजीव मोरे, पो.काँ/नितीन ठाकुर, पो.काँ/गणेश ठाकरे, पोकॉ/किरण पाटील, पोकॉ/राहुल घेटे, पो.कॉ/ शशिकांत मराठे, पोकॉ/रमाकांत साळुंखे, पोकॉ/ सुभाष साबळे, पोकॉ/ राहुल पाटील अशांनी केली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विठठल पवार हे करीत आहे.

पोलीस निरीक्षक
एम.आय.डी.सी.पोलीस स्टेशन जळगाव

Scanned with OKEN Scanner